जनतेच्या प्रेमाखातर ठाण्यात 'जनता दरबार' भरवणार

वनमंत्री गणेश नाईक यांचा निर्धार

ठाणे, दि. २८ : प्रतिनिधी

''नवी मुंबईसारखा कारभार ठाण्यामध्ये करायचा आहे, त्यासाठी ठाण्यात 'ओन्ली कमळ' फुलवायचे असून, लवकरच ठाणेकर जनतेच्या प्रेमाखातर गडकरी रंगायतनमध्ये पुन्हा 'जनता दरबार' भरवणार आहे,'' असा निर्धार राज्याचे वनमंत्री तथा पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला.

भाजपचे कोपरी-पाचपाखाडी विधानसभा क्षेत्राचे प्रभारी माजी नगरसेवक भरत चव्हाण व भाजप युवा मोर्चाचे प्रदेश चिटणीस ओंकार चव्हाण यांच्यावतीने मंगळवार, दि. २८ जानेवारी रोजी सायंकाळी कोपरीतील आनंद बॅन्क्वेट सभागृहात वनमंत्री गणेश नाईक यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, महिला अध्यक्ष स्नेहा पाटील, माजी नगरसेवक भरत चव्हाण, 'रूद्र प्रतिष्ठान'चे ॲड. धनंजय सिंह आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री नाईक म्हणाले की, ''आजवरच्या राजकीय वाटचालीचा उल्लेख करीत दुसऱ्याला वाईट बोलून तुम्ही मोठे होऊ शकत नाही. सकारात्मक राहून जगा,'' असा टोला लगावून आजकाल राजकारणातील स्तर खाली गेल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ''ऐरोली मतदारसंघातून पक्षाने मला उमेदवारी दिली. पण कार्यकर्त्यांना सांगितले होते की, कुणाचाही अपप्रचार किंवा कुणाविरुद्धही अनुद्गार काढायचे नाहीत. केवळ आपण काय करणार, याचाच प्रचार केला.''

पुढे बोलताना त्यांनी शिवसेना, राष्ट्रवादीनंतर आता भाजपमध्ये असल्याने 'शतप्रतिशत भाजप'साठीच कार्यरत राहणार असल्याचे निक्षून सांगताना आजवर मिळालेल्या मताधिक्याचा उहापोह केला. पूर्वी पालकमंत्री असताना आपण ठाण्यात 'जनता दरबार' भरवत होतो. त्याच धर्तीवर जिल्हाध्यक्ष वाघुले यांना उद्देशून, ''प्रशासनाला आताच सांगून ठेवा, ठाण्याच्या जनतेच्या प्रेमाखातर गडकरी रंगायतनमध्ये पुन्हा जनता दरबार भरवणार आहे,'' असे ते म्हणाले.

ठाण्यात 'ओन्ली कमळ'

''गेली २५ वर्षे नवी मुंबईत सत्ता राखल्याचा आवर्जून उल्लेख करीत मंत्री गणेश नाईक यांनी, नवी मुंबईत २० वर्षे घरपट्टी, पाणीपट्टी वाढवली नाही. २४ तास पाणी, शिक्षण मोफत देत असून पदपथ फक्त पादचाऱ्यांसाठी आहेत. कुणावरही जुल्म केला नसल्याचे स्पष्ट केले. असाच कारभार ठाण्यामध्ये करायचा आहे. आगामी ठाणे महापालिकेच्या निवडणुकीमध्ये गणेश नाईक नेतृत्वाच्या ठिकाणी राहतील. ठाण्यात 'ओन्ली कमळ' फुलवायचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सकारात्मक काम करीत आहे. पक्षाने ठाण्याची जबाबदारी माझ्याकडे दिली आहे. ठाणे सुरळीत करण्याचे काम माझे आहे,'' असे गणेश नाईक म्हणाले.

सिडकोच्या अभियंता भरती परीक्षेत 'मराठी' विषय समाविष्ट

ठाणे, दि. २८ : प्रतिनिधी

सिडको महामंडळामध्ये साहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील १०१ रिक्त पदे भरण्यासाठी मागील वर्षी ऑनलाईन अर्ज मागविले होते. या परीक्षेकरिता असलेल्या अभ्यासक्रमातून मराठी विषय वगळण्यात आल्याची तक्रार काही इच्छुक मराठी उमेदवारांनी मनसेचे संदीप पाचंगे यांच्याकडे केली होती. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळूनही शासन दरबारीच अशी उपेक्षा होत असल्याने पाचंगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर विषय परीक्षा प्रक्रियेत मराठी भाषा समाविष्ट केल्याची अधिसूचना सिडको प्राधिकरणाने काढली आहे.

> "साहाय्यक कार्यकारी अभियंता पदासाठी मराठी विषय वगळल्याची तक्रार मराठी अभियंत्यांनी पाचंगे यांच्याकडे तसेच 'म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई' यांनी सिडकोकडे केली होती. यापूर्वी मराठी विषय समाविष्ट होता. मात्र, काही अधिकाऱ्यांनी मुद्दाम हा खोडसाळपणा केल्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तसेच सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले होते.
>
> **– संदीप पाचंगे,** मनसे

सिडको महामंडळाने दि. १८ जानेवारी २०२४ रोजी साहाय्यक अभियंता या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. इंग्रजी, सामान्यज्ञान, आकलन क्षमता, व्यावसायिक ज्ञान हे परीक्षेचे विषय देण्यात आले होते. एकूण २०० गुणांच्या या परीक्षेत मराठी हा विषय वगळण्यात आला होता. याबाबत इच्छुक मराठी उमेदवारांनी मनसेकडे तक्रार केली होती. त्यानुसार मनसेच्या संदीप पाचंगे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी व संबंधित प्राधिकरणाशी पत्रव्यवहार केला होता. अखेर या पाठपुराव्याला यश आले. सिडको प्राधिकरणाने गुरुवार, दि. ९ जानेवारी २०२५ रोजी शुद्धीपत्रक काढत मराठी विषय परीक्षेत समाविष्ट केल्याचे जाहीर केले.

'ठाणे' अनधिकृत शाळांचे माहेरघर

ठाणे, दि. २८ : प्रतिनिधी

ठाणे महापालिका हद्दीत एकूण ८१ शाळा अनधिकृत आहेत. यात मराठी माध्यमाच्या दोन, हिंदी माध्यमाच्या दोन आणि इंग्रजी माध्यमाच्या ७७ शाळा आहेत. या शाळांमधून 'आयसीएसई', 'सीबीएसई', 'आयबी' तसेच राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या प्रवेशाचे सत्र सुरू झाले आहे. पालकांची फसवणूक होऊ नये, यासाठी महापालिकेने दि. ३० जुलै २०२४ रोजी बेकायदा शाळांची यादी प्रसिद्ध केली होती. तरीही, अनेक पालक आपल्या पाल्यांचे प्रवेश या शाळांमध्ये घेत आहेत.

ठाणे महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात खासगी शाळा सुरू झाल्या आहेत. अनेक शाळांतून नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी रस्त्याच्या कडेला जाहिरातीचे फ्लेक्स लावण्यात आले आहेत. या माध्यमातून पालकांची फसवणूक होत आहे. पालकांची फसवणूक होवू नये, यासाठी ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात एकही अनधिकृत शाळा सुरू राहणार नाही, याची दक्षता प्रशासन घेत आहे. पालिकेच्यावतीने अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सर्वाधिक ६५ बेकायदा शाळा दिवा, मुंब्रा परिसरात आहेत. सध्या सुरू असलेल्या अनधिकृत शाळेतील विद्यार्थ्यांचे पालकांच्या सहकार्याने अधिकृत शाळेत समायोजन करणे, दिवा परिसरात महापालिका स्तरावरुन मराठी व इंग्रजी माध्यमांची शाळा सुरू करण्याबाबत प्रयत्न सुरू आहेत.

कल्याण-पडघा मार्गावर नवीन समांतर पूल बांधा

नरेंद्र पवार यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

कल्याण, दि. २८ : प्रतिनिधी

कल्याण-पडघा मार्गावरील गांधारी नदीवर अस्तित्वात असलेल्या पुलाला समांतर नवीन उड्डाणपूल बांधण्याची मागणी कल्याणचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीसंदर्भात पवार यांनी मंगळवार, दि. २८ जानेवारी रोजी मुख्यमंत्र्यांची भेट घेत मागणीचे निवेदन सादर केले.

कल्याण शहरातून पडघामार्गे नाशिकला जाण्यासाठी सध्या गांधारी नदीवरील उड्डाणपूल हा एकमेव पर्याय आहे. मात्र, हा पूल बांधून ३० वर्षांहून अधिक काळ झाला आहे. सद्यस्थिती पाहता, हा पूल अतिशय अरुंद आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्या गेल्या तीन दशकांत प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

राज्याच्या दृष्टीने गेमचेंजर प्रकल्प असणाऱ्या मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाला जोडणारा इंटरचेंजही याच मार्गावरील आमणे गावात बांधण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण-पडघा मार्गावरील वाहतुकीत येत्या काळात आणखी मोठी भर पडणार आहे. अस्तित्वात असलेला गांधारी उड्डाणपूल त्यासाठी निश्चितच अपुरा पडेल, अशी वस्तुस्थिती माजी आमदार पवार यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर मांडली आहे.

महापुरामुळे गांधारी पुलाला तडे गेले आहेत. हा उड्डाणपूल कल्याण-पडघामार्गे नाशिक, आग्र्याला जाणारा दुवा असून, या मार्गावर बापगाव, सोनाळे, सावद, लोणार या गावांतील हजारो रहिवाशांना कल्याणला जोडणारा महत्त्वाचा टप्पा आहे. या भागात मोठ्या संख्येने गोडाऊनही झाली आहेत. यामध्ये काम करणारे हजारो कर्मचारी रोज याच मार्गावरून ये-जा करीत असतात.

संविधान परिचय कार्यशाळेतून उलगडले संविधानाचे महत्त्व

नवी मुंबई, दि. २८ : प्रतिनिधी

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'हर घर-संविधान साक्षर' ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, यामध्ये नवी मुंबई महापालिकेने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आधीपासूनच आघाडी घेतली आहे.

यापूर्वी दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी नमुंमपाच्या उच्चपदस्थ अधिकारी यांच्याकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली याठिकाणी संविधान परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र शासनाचे सेवानिवृत्त मुख्य सचिव जे. एस. सहारिया यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले होते. याचाच पुढचा भाग म्हणून महापालिकेच्या परिमंडळनिहाय अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता एकदिवसीय 'संविधान परिचय कार्यशाळा' आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच त्याची अंमलबजावणी ही शुक्रवार, दि. २४ जानेवारी रोजी महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रामध्ये परिमंडळ-१ मधील अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता करण्यात आली आहे.

नटलेल्या कारमध्ये मातृशक्तीकडून रस्ता सुरक्षेचे धडे

ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या रस्ते सुरक्षा अभियानात १५० महिलांची कार रॅली

ठाणे, दि. २८ : प्रतिनिधी

घराला घरपण येण्यासाठी जशी कुटुंबात एखादी महिला असावी, त्याच धर्तीवर वाहन सुरक्षित चालविण्यासाठी मातृशक्ती रस्त्यावर उतरून जनजागृती करीत आहे. 'रस्ता सुरक्षा अभियान, २०२५ अभियानां'तर्गत प्रादेशिक परिवहन ठाणे आणि 'इनरव्हिल क्लब डिस्ट्रिक' व 'पिंक होलिक इंडिया फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच महिलांच्या कार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

मातृशक्तीच्या या रॅलीत १५०हून अधिक महिलांनी नटलेल्या कारद्वारे वाहतूक नियमांची जनजागृती केली. वाहतूक नियमांचे पालन करून वाहन चालवल्यास रस्ते अपघाताची शक्यता कमी असते. त्यामुळे वाहन चालवतांना कोणती

काळजी घ्यावी, हे सांगण्यासाठी ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एका अनोख्या कार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत पन्नासहून अधिक कार आणि १५हून अधिक अबोली रिक्षा चालकांनी सहभाग नोंदवला होता, अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी दिली.

मातृशक्तीची ही कार रॅली प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे येथून पुढे नितीन जंक्शन-कॅडबरी जंक्शन-उपवन तलाव-काशिनाथ घाणेकर नाट्यगृह ते परत प्रादेशिक परिवहन कार्यालय, अशी घेण्यात आली. यावेळी कारच्या दर्शनी भागात वाहतूक नियमांची माहिती दाखवणारे पोस्टर लावण्यात आले होते, तर या रॅलीत प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगरसेवक परिषा सरनाईक, 'इनरव्हिल क्लब'च्या अध्यक्ष प्रेरणा रायचूर आदी मान्यवर उपस्थित होत्या.

यावेळी काही निवडक कारचालक महिलांना सर्टिफिकेट आणि हेल्मेट देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद नलावडे, गणेश पाटील मोटर वाहन निरीक्षक दत्तात्रय खराडे, विक्रम पाटील, शिवाली सोमवंशी, जयश्री झिने आदींनी मेहनत घेतली.

ठाण्यात बुटाच्या दुकानाला आग

ठाणे : घोडबंदर रोडवरील कासारवडवली परिसरातील हायपर सिटी मॉलच्या पहिल्या मजल्यावरील एका नामांकित बूट कंपनीच्या दुकानाला आग लागल्याची घटना मंगळवार, दि. २८ रोजी सकाळी घडली. मॉलमधून मोठ्या प्रमाणात धूर आकाशात पसरला होता. या आगीत दुकानातील बूट आणि कपडे आदी वस्तू जळून नुकसान झाले. सुदैवाने दुकानाच्या बाजूला असलेला गाळा रिकामा असल्याने आग पसरली नसल्याने कुणीही जखमी झाले नाही. अग्निशमन दल आणि बचाव पथकांनी तासाभरात आगीवर नियंत्रण मिळविले. आगीचे कारण समजू शकले नाही, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

'संविधान गौरव अभियान' सुरू

खानिवडे, दि. २८ : प्रतिनिधी

भारताच्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याअनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेप्रमाणे, संपूर्ण देशात दि. ११ जानेवारी ते दि. २५ जानेवारी यादरम्यान 'संविधान गौरव अभियान' सुरू होते. त्याचाच भाग म्हणून 'भाजप वसई-विरार जिल्हा व अनुसूचित जाती मोर्चा' यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कार्यालय आचोळे या ठिकाणी 'संविधान गौरव अभियाना'ला सुरुवात झाली आहे. अभियानाच्या पहिल्या सभेत प्राध्यापक आरती पूगावकर यांनी प्रमुख वक्ता म्हणून प्रबोधन केले.

''देशासाठी संविधान हे सर्वांसाठी असून, आपण आपली संविधानाने दिलेले कर्तव्य आणि अधिकार समजून घेतले पाहिजे. भारताचे संविधान सर्वोच्च असून, आपल्या देशातील प्रत्येक नागरिकांसाठी संविधानात अधिकार दिले आहेत,'' असे मत आ. राजन नाईक यांनी मनोगतात व्यक्त केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

पनवेल, दि. २८ : प्रतिनिधी

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत पनवेल महापालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून काव्यवाचन स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्न मंजूषा, राज्य गीत प्रसारासाठी फलकाचे अनावरण, असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

महापालिकेच्यावतीने काव्यसंमेलन व काव्य स्पर्धेचे आयोजनही करण्यात येणार आहे. पनवेल महानगरपालिकेच्या दहा शाळांमधून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला.

या पंधरवडा काळात निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा, वक्तृत्त्व स्पर्धा व शुद्ध लेखन स्पर्धा आदींचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेच्या दहा शाळांमधील विद्यार्थ्यांना मराठी भाषेची समृद्धता कळावी, महत्त्व कळावे या उद्देशाने घेण्यात आलेल्या या विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

राज्यगीताचा फलक

मराठी राजभाषेचा जास्तीत जास्त प्रसार-प्रचार व्हावा, मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, यासाठी राज्य शासनाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

वन्यप्राणी व मानवाच्या सहजीवनासाठी अधिक प्रयत्न आवश्यक : डॉ. विनया जंगले

ठाणे, दि. २८ : प्रतिनिधी

''आधुनिक भारत हा तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा विकास आणि प्राचीन व सम्यक संस्कृती यांचा एक सुंदर मिलाफ आहे. या विकासपर्वात शाश्वत प्रगती व वन्यजीव संरक्षण यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, ज्याचा पुरस्कार आपल्या संस्कृतीने नेहमीच केला आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ पशुवैद्यकीय व वन्यजीव तज्ज्ञ डॉ. विनया जंगले यांनी केले.

क्षमता विकास, प्रशिक्षण व सामाजिक संशोधन या

क्षेत्रात १९८२ पासून कार्यरत असलेल्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने कायम दिशादर्शक चर्चा व विचारमंथन यांना प्रोत्साहन दिले आहे. याच परंपरेला धरून मंगळवार, दि. २८ जानेवारी रोजी डॉ. विनया जंगले यांच्याशी परस्परसंवाद व त्यांच्या निसर्ग संवर्धनातील महत्त्वपूर्ण कार्याबद्दल सत्कार, असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यावेळी डॉ. जंगले बोलत होत्या. संस्थेच्या ठाणे जिल्ह्यातील उत्तनमधील निसर्गरम्य, अशा ज्ञान नैपुण्य केंद्रात हा छोटेखानी सोहळा संपन्न झाला.

सन्मान संवाद उपक्रम

डॉ. जंगले यांचा छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा असलेले सन्मानचिन्ह, शाल, प्रबोधिनीचा चरित्रग्रंथ व तुळशीचे रोप देऊन सन्मान करण्यात आला. प्रबोधिनीच्या अनिल पांचाळ व जयवंत शेलार यांच्या समन्वयातून आयोजित केलेल्या या कार्यक्रमातून उपस्थितांची निसर्गाशी तोंडओळख झाली.

बिबट्यासोबत सहजीवन

डॉ. विनया जंगले म्हणाल्या की, ''बिबट्यासारख्या प्राण्याचे मानव हे भक्ष्य नाही. बिबट्याला डिवचले नाही, तर काही त्रास देत नाहीत.'' यावेळी त्यांनी डहाणू, बोर्डी, मुंबईतील आरे वसाहत, राष्ट्रीय दुग्ध विकास निगम व भांडूप, वसई किल्ला, भिवंडीतील पडघा आणि ठाण्यातील ओवळा येथे मानवी वस्तीत शिरलेले बिबटे व त्यांना पकडून रानात पुन्हा मोकळे केल्याच्या चित्तथरारक घटना कथन केल्या.

माणसाने वन्यप्राणी व त्यांचा अधिवास समजून घेतला पाहिजे : डॉ. विनया जंगले

पर्यावरण रक्षणाबद्दल जागृती, तसेच रंजक माहितीतून प्रेरणा घेणे, हा या कार्यक्रमाचा हेतू होता. शहरीकरण व पायाभूत सुविधा वाढताना नागरी माणूस वन्यप्राण्यांच्या जास्त संपर्कात येत असल्याने हे अधिक महत्त्वाचे झाले आहे. उपस्थित असलेले प्रबोधिनीचे प्रशिक्षक, संशोधक व कर्मचाऱ्यांना संबोधित करताना डॉ. जंगले यांनी वन्य प्राण्यांची सुश्रुषा व अभ्यास करताना आलेले समृद्ध अनुभव सांगितले. त्यांच्या सादरीकरणात डॉ. विनया जंगले म्हणाल्या की, ''बिबट्या, हत्ती व सर्वच वन्यप्राणी संवेदनशील व बुद्धिमान असतात. शांततापूर्ण सहजीवनासाठी निसर्गाप्रती आपणही संवेदनशील होणे आवश्यक आहे. प्राण्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी मानवाने अधिवास राखला पाहिजे.''

मध्य रेल्वे

शाकू कपलर कम्पोनंट्सकरिता स्प्रिंग टेस्टींग मशीन

निविदा सूचना क्र. : आरआर/पीआर/एसएनपीडी/२७५/२४-२५/५१

कामाचे नाव: पीओएच-एसएनपीडी येथे रेल्वे कामाच्या व्यापीनुसार सेंटरिंग डिव्हाईसेसमध्ये शाकू कपलर कम्पोनंट्सकरिता स्प्रिंग टेस्टींग मशीनचा पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन. **कामाची अंदाजित किंमत:** रु. १५८४५८० **इसारा रक्कम:** रु. ३१७००. **निविदा अर्जाची किंमत:** शुन्य. **पूर्तता कालावधी:** १२० दिवस. **निविदा सादरीकरण बंद होण्याचा दिनांक आणि वेळ:** दि. १५.०२.२०२५ रोजी १४.०० वाजेपर्यंत. **बोली सुरु होण्याचा दिनांक:** ०१.०२.२०२५. निविदा फक्त ई-निविदा नमून्यामध्ये वेबसाईट **www.ireps.gov.in** द्वारे स्वीकारण्यात येईल. निविदा दस्तऐवज वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

एडीईई/पीओएच-एसएनपीडी 733

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

मध्य रेल्वे

इनडोअर आणि आऊटडोअर सिग्नलिंग गिअर्स बदलणे

खुली निविदा सूचना क्र. सीआर-बीबी-एसएनटी-पीजेटी-२०२५-०७

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एसॲण्डटी), १ला मजला, पार्सल कार्यालय इमारत, प्लॅटफॉर्म क्र. १४ आणि १५ च्या वर, मध्य रेल्वे, मुंबई सीएसटी ४००००१, भारताच्या राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून खुल्या निविदा आमंत्रित करीत आहेत. निविदेचा वेळ, दिनांक आणि सादरीकरण दि. २५.०२.२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत आहे आणि त्याच दिवशी १५.१५ वा. उघडण्यात येतील. **कामाचे नाव:** मुंबई विभागाच्या सीएसएमटी-कल्याण अनुभागामध्ये इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगसह माझगाव यार्ड आरआरआयचे इनडोअर आणि आऊटडोअर सिग्नलिंग गिअर्स बदलणे आणि ८ नग स्टॅब्लिंग सायडींग्जची तरतूद. **अंदाजित किंमत:** रु. १४.२४ कोटी. **ईएमडी:** रु. ८६२२००.००/-, **उघडण्याचा दिनांक:** २५.०२.२०२५ **वैधता:** ६० दिवस, **पूर्तता कालावधी:** १२ महिने. सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण (मेक इन इंडिया) आदेश २०१७, दिनांक १५.०६.२०१७ चे अनुपालन करते. निविदेचे संपूर्ण तपशील मध्य रेल्वे अधिकृत वेबसाईट **www.ireps.gov.in** येथे उपलब्ध आहेत. संपूर्ण निविदा दस्तऐवज वेबसाईटवरुन डाऊनलोड करता यतील. निविदांचे संपूर्ण तपशील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एसॲण्डटी) यांचे कार्यालय, मुंबई सीएसटीच्या "सूचना फलका"मध्ये देखील उपलब्ध आहेत.

डीआरएम(एसॲण्डटी) सीएसएमटी 730

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

मध्य रेल्वे

इलेक्ट्रिकल इंटर व्हेहिक्युलर कपलर्स

निविदा सूचना क्र. : सीडब्ल्यूई/एम टीएन/८५२४६८९५/२०२५

निविदा क्र.: ८५२४६८९५ **तपशील:** संलग्न परिशिष्टानुसार मे. सिकेम केबल्स आणि मे. हार्टिंग कनेक्टर्ससह बीएचईएल तपशील दस्तऐवज क्र. टीएसजी-एसी ईएमयू-एसपीईसी/०२६ रिव्ह. क्र. ०२ दिनांक ०४.०१.२०१३ नुसार १२ कार बीएचईएल वातानुकूलित ईएमयू डब्यांकरिता इलेक्ट्रिकल इंटर व्हेहिक्युलर कपलर्स. (टीप: मालवाहक - वरि. विविअभि/टीआरएस/कुर्ला) **परिमाण:** ०१ संच. **उघडण्याचा नियत दिनांक:** २०.०२.२०२५ **निविदा शुल्क:** रु. १२३३१२७१.४०. अधिक तपशील मध्य रेल्वे अधिकृत वेबसाईट **www.ireps.gov.in** येथे उपलब्ध आहेत, जेथून सर्व अर्ज डाऊनलोड करता येतील. 732

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

पश्चिम रेल्वे

ट्रॅकमेनकरिता टूल रुम सह विश्रामगृह पुरविणे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४००००८ आमंत्रित करीत आहेत **ई-निविदा सूचना क्र.: बीसीटी/२४-२५/२७४ दि. २४.०१.२०२५. काम आणि ठिकाण: विरार-जोरावसन अनुभाग** टीएफआर-२२.१३८टीकेएम आणि ट्रॅकमेनकरिता टूल रूम सह विश्रामगृहाच्या संबंधात वरि. विअभि/उत्तरच्या कार्यक्षेत्रामध्ये ट्रॅकमेनकरिता टूल रूम सह विश्रामगृह पुरविणे. ईलेक(पी)पोर्शन समाविष्ट असलेली एकत्रित निविदा. **कामाची अंदाजित किंमत:** ₹४,४६,६९,८२१.२९ **ईएमडी:** ₹३,७३,४००/-. **सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ:** दि. २१.०२.२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** दिनांक २१.०२.२०२५ रोजी १५.३० वा. अधिक तपशीलाकरिता आमची वेबसाईट **www.ireps.gov.in** ला भेट द्या. 1015

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly

डहाणू नगरपरिषद

दुसरा मजला, कुमार कॉर्नर, मल्याण (प.), ता. डहाणू, जि. पालघर ४०१६०२.
दूरध्वनी: ०२५२८-२२४४६२ ईमेल: dmc.dahanu@gmail.com

जा.क्र.डनप/सा.प्र./३२७४/२०२४-२५ दिनांक: २७/०१/२०२५

जाहीर सूचना

''महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५'' अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित करणेबाबत.

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच नागरिकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५, दि. २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने लोकसेवा अधिसूचित करण्यात येत आहेत. तसेच त्याची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी तसेच या सेवा वेळेवर न पुरविल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी डहाणू नगर परिषदेच्या नोटीस बोर्डवर तसेच https://mahaulb.in/PortalSite/#/app/home या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सही/-
प्रशासक तथा मुख्याधिकारी
डहाणू नगर परिषद, डहाणू

निवेदन

मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकूरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबाबदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.